# कमला महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

▶ **कोल्हापूर**

ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात ग्रंथालय सप्ताहानिमित्त दिनांक १६ पासून १७ ऑगस्ट पर्यंत ग्रंथालय विभाग व विजयश्री बुक सेंटर, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आलेले आहे. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन ताराराणी विद्यापीठाचे सचिव व कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पूजनाने झाले.

उद्घाटनानंतर या उपक्रमाबद्दल बोलताना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले की, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये सुध्दा पुस्तके आपले सस्तित्व टिकवून आहेत. वाचनामुळे व्यक्तीमत्वाचा विकास होऊन वैचारिक संपन्नता वाढते व भविष्यकाळातील वाटचालीस दिशा प्राप्त होते.

ग्रंथ प्रदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उपयुक्त पुस्तके, समाजशास्त्र, मानसशास्त्र. संगणक, पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षांसाठी उपयुक्त ग्रंथ विद्यार्थिनींना पाहण्यास ठेवण्यात आले. आहेत. सदर प्रदर्शनामध्ये विद्यार्थिनींसाठी सवलतीच्या दरामध्ये ग्रंथ उपलब्ध करुन दिले जाणार आहेत.

या प्रदर्शनाचा लाभ संस्थेतील सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनींना होत आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल सौ. अर्मिला कदम यांनी केले. उद्घाटन प्रसंगी प्रा. आनंदा साळोखे, डॉ. सौ. भारती शेळके, डॉ. सौ. अनघा पाठक, प्रा. रेखा पंडित आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.